


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २११ वा शनिवार दि ११ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# मनसेशी युती ठरली, मुंबईत जागावाटपाच्या बोलणीसाठी उद्धव ठाकरेंचे तीन शिलेदार, घोषणेचा मुहूर्तही निश्चित?

वृत्तसंस्था/मुंबई

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यातील राजकीय युतीचा मार्ग मोकळा झाला आहे. दोन्ही पक्षांच्या पहिल्या फळीतील नेत्यांमध्ये जागा वाटपाची बोलणी सुरु झाल्याचे खात्रीलायकरीत्या समजते. निवडणुकांच्या वेळापत्रकाची घोषणा होताच या दोन्ही पक्षांतील राजकीय युतीचीही घोषणा होणार असल्याची माहिती आहे. तोपर्यंत जागावाटप पूर्ण करण्यावर भर देण्यात येत असल्याचे समजते. हिंदी भाषा सक्तीच्या निमित्ताने ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे एकत्र आल्यानंतर त्यांच्यातील भेटीगाठी सातत्याने वाढत गेल्या. राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था तसेच महापालिका निवडणुकांच्या निमित्ताने राजकीय युती करण्याबाबत या दोन्ही पक्षांत एकमत झाल्याचे कळते. त्यातही मुंबई महापालिकेत राज्यातील महायुतीच्या विराधात ठाकरे बंधू यांनी युती करण्याचे ठरवल्याचे समजते. त्यानुसार प्रत्येक महापालिकेसाठी जागा वाटप ठरवण्यासाठी दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांच्या बैठकांना सुरुवात होणार आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उबाठाकडून अनिल परब, वरूण सरदेसाई आणि सुरज चव्हाण यांच्यावर जागा वाटपाची बोलणी करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. ठाण्यात राजन विचारे, केदार दिघे आणि स्थानिक नेते तसेच पुण्यात वसंत मोरे, आदित्य शिरोडकर आणि स्थानिक नेते जागा वाटपाची बोलणी करतील. मनसेकडून बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे, नितीन सरदेसाई, अविनाश अभ्यंकर यांच्याकडे जबाबदारी असेल. मनसे नेते अमित ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वी मुंबईतील विभागप्रमुखांची विभागवार बैठक घेऊन प्रत्येक वॉर्डातील राजकीय परिस्थिती, समीकरणे आणि पक्षाची बलस्थाने जाणून घेतली. राज ठाकरे यांनीही मुंबई मुंबई महापालिकेसाठी कोणत्या जागा मागता येतील याची यादी मुंबई शहराध्यक्ष संदीप देशपांडे आणि उपशहर अध्यक्षांकडे मागितली आहे. ठाकरे गट आणि मनसे यांच्यातील युतीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार



गटाला सामावून घेता येईल का याचीही चाचपणी सुरू असल्याचे समजते. सर्व पार्श्वभूमीवर उबाठा पक्षाचे नेते संजय राऊत यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची परवा भेट घेऊन चर्चा केल्याचे समजते.

# सरन्यायाधीशांवरील हल्ल्याचा बुलढाणा वकील संघाकडून निषेध...

जनसंचलन/बुलढाणा

सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर हल्ल्याचा प्रयत्न करणाऱ्या वकिलावर कठोर फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बुलढाणा जिल्हा वकील संघाने केली आहे. या घटनेच्या निषेधार्थ ७ ऑक्टोबर रोजी जिल्हा वकील संघाच्या सभागृहात विशेष सभा घेऊन ठराव एकमताने पारित करण्यात आला. संघाचे अध्यक्ष ॲड. विजय सावळे व सचिव ॲड. अमर इंगळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ६



अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देताना जिल्हा वकील संघाचे पदाधिकारी.

ऑक्टोबर रोजी नवी दिल्लीतील सर्वोच्च न्यायालयात न्यायदानाचे कामकाज सुरू असताना वकील राकेश रघुराज किशोर या वकिलाने सरन्यायाधीश गवई यांच्याकडे जोडा फेकण्याचा प्रयत्न केला. सुरक्षारक्षकांनी तत्काळ त्याला ताब्यात घेतल्याने अनर्थ टळला. या दुर्दैवी घटनेचा बुलढाणा जिल्हा वकील संघाने तीव्र शब्दांत निषेध नोंदवत म्हटले आहे की, ही कृती केवळ न्यायमूर्ती गवई यांच्यावर नव्हे, तर भारतीय न्यायव्यवस्थेच्या प्रतिष्ठेवर झालेला हल्ला आहे. संघाने संबंधित वकिलावर फौजदारी गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा करावी, अशी मागणी केली आहे. न्यायमूर्ती गवई यांनी मनाचा मोठेपणा दाखवत त्या वकिलाविरुद्ध कोणतीही कारवाई न करण्याचा निर्णय घेतला, ही त्यांच्याकडून दर्शविलेली उच्च नैतिकतेची भूमिका आहे. मात्र, संबंधित वकील नंतरही इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून गैरकृत्याचे समर्थन करीत राहिला, हे अधिकच निंदनीय आहे. त्यामुळे त्या वकीलावर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी वकीस संघाच्या वतीने निवेदनातून केली आहे.

# क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या दणक्याने अखेर आंचरवाडी येथे बसविले रोहित्र!

जनसंचलन/ चिखली

तालुक्यातील आंचरवाडी गावातील शेतकरी गेल्या अनेक महिन्यापासून वीज पुरवठ्याच्या तीव्र समस्येला सामोरे जात होते. येथे क्रांतिकारी संघटनेच्या पुढाकारामुळे नवीन डीपी बसवण्यात आली. आंचरवाडीत अतिवृष्टी व सततच्या पावसामुळे शेतात पाणी साचून पिकांची प्रचंड नुकसान झाले असून त्या शेतीतील पाणी काढण्यासाठी डीपी बसवणे गरजेचे होते. गावकऱ्यांनी वारंवार वीज वितरण कंपनीचे वायरमन यांना कळविले परंतु त्यांनी शेतकऱ्यांना विजेचे बिल भरण्याचा अजब सल्ला देऊन टाळाटाळ केली. आंचरवाडी येथील शेतकऱ्यांनी, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे सुनील मिसाळ व अरुण परिहार यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला. आणि आपल्या समस्या घेऊन शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचे हेल्पलाइन शेतकऱ्यांच्या सेंटर बुलढाणा गाठून



क्रांतिकारी चे नेते अमोल मोरे यांच्या कानावर कैफियत मांडली अमोल मोरे यांनी संबंधित आंचरवाडी येथील वायरमन आणि सबंधित इंजिनिअर परिस्थितीची जाणीव करून, तत्काळ डीपी बसवा अन्यथा शेतकऱ्यांच्या रोशाला सामोरे जावे लागेल असा सज्जड इशारा दिला. दरम्यान वीज वितरण कंपनीने तत्काळ डीपी काढून त्या ठिकाणी नवीन डीपी बसवण्यात आली. या निर्णयामुळे गावातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून पिकांना योग्य वेळी त्यांचा फायदा होईल. डीपी बसल्यावर ग्रामस्थांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अमोल मोरे, आणि सुनील मिसाळ यांचे आभार मानले.

# वित्ततंत्रज्ञानाचा मंत्रोच्चार

## संपादकीय लेख

आपल्या आर्थिक प्रगतीचा वेग पाहता, आर्थिक व्यवहारांना तंत्रज्ञानाची जोड देणे आता गरजेचे झाले आहे. अशी जोड देताना आज आपण जगभरात या वित्ततंत्रज्ञानात (फिनटेक) आघाडी घेतली आहे. या फिनटेकचा आधार असलेल्या कृत्रिम प्रज्ञेच्या (एआय) जगात वावरताना आपण अन्य देशांच्या तुलनेत नवे आहोत. आपल्याआधी अमेरिका, चीन या देशांनी एआय क्षेत्रात आपला दबदबा निर्माण केला होता. त्यानंतर आपण या क्षेत्रात उतरलो आणि जगाला आश्चर्य वाटेल अशा रीतीने वाटचाल करू लागलो. यामागे आपल्या तंत्रज्ञांचे अथक प्रयत्न आणि या त्यांना दिलेली कल्पकतेची जोड जशी कारणीभूत ठरली, त्याचप्रमाणे अमेरिका आणि चीन यांनी केलेल्या चुका किंवा त्यांना आलेले अपयश हेदेखील आपल्यासाठी मार्गदर्शक ठरले. आपल्या वित्तक्षेत्राला एआय क्षेत्रातील प्रयत्नांची आपण जोड दिली आणि अक्षरशः क्रांती झाली. ग्लोबल फिनटेक फेस्टच्या आयोजनाला केंद्र सरकारचे वाणिज्य मंत्रालय, अर्थ मंत्रालय, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स व आयटी मंत्रालय आणि त्यांचे विभाग यांचा सक्रिय पाठिंबा होता. त्याचबरोबर भारतीय रोखे व विनिमय महामंडळ (सेबी), नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय), रिझर्व्ह बँक, पेमेंट्स कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय), फिनटेक कन्व्हर्जन्स कौन्सिल (एफसीसी) या संस्थांचे योगदान महत्त्वाचे होते. ङ्गअधिक दर्जेदार जगाच्या निर्मितीसाठी वित्तक्षेत्राला एआयचे पाठबळ देणेफ ही यावर्षीच्या ग्लोबल फिनटेक फेस्टची मध्यवर्ती संकल्पना होती. हा विचार आपण एआय वापरून निर्माण करत असलेल्या सुविधा, उत्पादनांचा मुख्य आधार राहिलेला आहेच. युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस(यूपीआय) हे त्याचे उत्तम उदाहरण. ८० हजारहून अधिक जणांनी फिनटेक महोत्सवाला भेट दिली. जपान, सौदी अरेबिया, आफ्रिका, सिंगापूर, जर्मनी आदी देशांतून सुमारे ८०० तज्ज्ञ आणि विविध कंपन्यांचे अधिकारी यांनी विविध परिसंवादांतून आपली मते मांडली.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते सुरुवात झालेल्या या परिषदेत गुजरातमधील ङ्गगिफ्टफ सिटीमध्ये कार्यरत ङ्गइंटरनॅशनल फायनान्शियल सर्व्हिसेस सेंटरफ्साठी ङ्गफॉरेन करन्सी सेटलमेंट सिस्टिमफची घोषणा केली गेली. एनपीसीआयनिर्मित यूपीआय प्रणाली वापरून पेमेंट करताना चार आकडी पिन क्रमांकाबरोबरच वापरकर्त्याचा चेहरा आणि बायोमेट्रिक पडताळा करून पेमेंट व्यवहार पूर्ण करण्याची सुविधाही उपलब्ध करून दिली गेली. रिझर्व्ह बँकेने यापूर्वी प्रायोगिक तत्त्वावर बाजारात आणलेल्या ङ्गसेंट्रल बँक डिजिटल करन्सीफ(सीबीडीसी) किंवा ई-रुपयाचा नवा अवतार इथे सादर केला. प्रोग्रॅमेबल सीबीडीसीफ असे याला नाव देण्यात आले असून यामध्ये नेमक्या कोणकोणत्या दैनंदिन व्यवहारांसाठी ई-रुपया वापरायचा आहे हे वापरकर्त्याला आधीच ठरवण्याची आणि तशा आज्ञा ङ्गई-रुपीफ्ला देता येण्याची सुविधाही इथे सादर केली गेली. ब्रिटनचे पंतप्रधान किअर स्टार्मर यांची उपस्थिती या जागतिक परिषदेला वेगळ्या उंचीवर घेऊन गेली. त्यांनीही फिनटेक विश्वातील भारताचे अग्रस्थान मान्य केले. भारताच्या आर्थिक घोडदौडीचे हे प्रत्यक्ष प्रमाण आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. परिषदेचा समारोप करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आवर्जून, जनधन, आधार आणि मोबाइल या त्रयीचा उल्लेख केला. अशा वेगवेगळ्या सुविधांनी पेमेंट व्यवहार सोपे करतानाच सायबर सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण होऊ पाहत आहे. पेमेंट व्यवहारांची




पूर्तता करताना वापरकर्त्याची वैयक्तिक माहिती, बँक खात्यांची माहिती सायबरचोरांकडून चोरली जाणे, कार्ड व्यवहारांच्या वेळी कार्डाचे क्लोनिंग केले जाणे यांसारखे प्रकार वाढत आहेत. आता या तंत्रज्ञानाच्या सुरक्षेकडे प्राधान्याने लक्ष द्यावे लागणार आहे. ङ्गभारत एआयफ म्हणून आपल्या विविध एआय-आधारित सुविधा जगापुढे घेऊन जाता हा मुद्दा अग्रस्थानी ठेवणे क्रमप्राप्त आहे. भारताचा एआयकडे पाहण्याचा दृष्टिकोन या तीन दिवसांमध्ये सर्वांना भुरळ पाडून गेला. एआय तंत्रज्ञान लोकाभिमुख असायला हवे. सर्वसामान्यांना या तंत्रज्ञानाचे दडपण न येता ते त्याच्या दैनंदिन जीवनाला सुकर करण्यासाठी साह्यभूत होणे गरजेचे आहे. हे तंत्रज्ञान परवडणाऱ्या दरात उपलब्ध व्हायला हवे आणि ते सर्व बाजूंनी सुरक्षितदेखील हवे. या तीन दिवसांत प्रामुख्याने या सर्व मुद्द्यांवर ऊहापोह झाला. या सर्व मुद्द्यांचा विचार आपण प्रथमपासूनच करत असल्यामुळे भारताची छाप या जागतिक दर्जाच्या वित्ततंत्रज्ञान परिषदेवर स्पष्टपणे दिसली. वित्ततंत्रज्ञानाचा ङ्गमंत्रोफ्च्चार आजच्या काळात अपरिहार्य आहे, हे अधोरेखित करणारी ही परिषद होती, हे नक्की.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# कार्यालयातील परिसरात जाऊ द्या, अन्यथा..'



**पुणे :** मुंबईनंतर आता पुण्यातील वाहतूक कोंडी ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील मोठी समस्या बनली आहे. विशेषतः सणासुदीच्या दिवसांत शहरात आणि औद्योगिक परिसरांमध्ये प्रचंड गर्दी होत असून, दोन ते तीन तास वाहनचालकांना कोंडीत अडकून पडावे लागते. याच पार्श्वभूमीवर ट्राफिक मुक्त चाकण कृती समिती, ग्रामस्थ आणि एमआयडीसीतील कामगारांनी आज गुरुवारी रस्त्यावर उतरून संताप व्यक्त करत आंदोलन केलं.वाहतूक कोंडीसह इतर पायाभूत सुविधांच्या मागणीसाठी नागरिकांनी झचठऊअ कार्यालयावर धडक मोर्चा काढला. या मोर्चात खासदार ओश्र ज्ञेश्रहश आमदार बाबाजी काळे आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. मोर्चादरम्यान खासदार अमोल कोल्हे यांनी प्रतिनिधीमंडळाला पीएमआरडीएच्या कार्यालयात प्रवेश देण्याची मागणी केली. मात्र, पोलिसांनी सुरुवातीला ती मागणी फेटाळली, त्यामुळे काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं. अखेरीस आंदोलकांच्या आग्रहानंतर खासदार, आमदार आणि स्थानिक प्रतिनिधींना कार्यालयात प्रवेश देण्यात आला.कुठला नियम लागतो, शांततेत आम्ही मोर्चा इथपर्यंत आणला आहे. आम्हाला कार्यालयातील परिसरात जाऊ द्या, कुठल्या नियमाने आम्हाला आडवता', असं म्हणत अमोल कोल्हे यांनी पोलिसांसमोर आक्रमक भूमिका घेतल्याचं पाहायला मिळालं. 'एकतर आम्हाला आतमध्ये जाऊ द्या, नाहीतर प्रशासनाला खाली बोलवा', अशा तीव्र शब्दात संताप व्यक्त केला. त्यानंतर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजेच एमएमआरडीएच्या कार्यालयात खासदार, आमदार, मोर्चातील लोकप्रतिनिधी आणि शिष्टमंडळाला सोडण्यात आलं.

'कुठला नियम लागतो, शांततेत आम्ही मोर्चा इथपर्यंत आणला आहे. आम्हाला कार्यालयातील परिसरात जाऊ द्या, कुठल्या नियमाने आम्हाला आडवता', असं म्हणत अमोल कोल्हे यांनी पोलिसांसमोर आक्रमक भूमिका घेतल्याचं पाहायला मिळालं. 'एकतर आम्हाला आतमध्ये जाऊ द्या, नाहीतर प्रशासनाला खाली बोलवा', अशा तीव्र शब्दात संताप व्यक्त केला. त्यानंतर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजेच एमएमआरडीएच्या कार्यालयात खासदार, आमदार, मोर्चातील लोकप्रतिनिधी आणि शिष्टमंडळाला सोडण्यात आलं.

यावेळी आंदोलकांनी 'चाकण एमआयडीसी हद्दपार होत आहे, आणि सरकार व प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नाही', अशी तीव्र नाराजी व्यक्त केली. 'गुरुवारी वाहतूक कमी असल्याने आज पाहणी दौरा झाला, परंतु रोजच्या वाहतूक कोंडीवेळी पोलीस आणि प्रशासन कुठे असतात?' असा सवालही आंदोलकांनी उपस्थित केला. सकाळी सहा वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या पाहणी दौऱ्याचाही उल्लेख करून आंदोलकांनी प्रशासनावर कागदी कारवाई केल्याचा आरोप केला. चाकण परिसरातील वाढती वाहतूक समस्या, अपुऱ्या रस्त्यांची स्थिती आणि औद्योगिक विकासाकडे होत असलेले दुर्लक्ष या मुद्द्यांवर नागरिक आणि एमआयडीसी कर्मचारी संतप्त झालेले दिसून आलं.

## विखे जरांगेंच्या भेटीला, तब्बल सव्वा तास बंद दाराआड चर्चा



**जालना :** मराठा मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज अंतरवाली सराटीमध्ये जाऊन मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. यावेळी दोघांनी एकमेकांचा सत्कार केला. जवळपास सव्वा तास दोघांमध्ये बंद दाराआड चर्चा झाली. ही व्यक्तिगत भेट असून त्यांच्या तब्येतीची आपण विचारपूस केली असल्याचं राधाकृष्ण विखे पाटील यांनी म्हटलं आहे. 'मराठा आरक्षणाच्या २ सप्टेंबरच्या जीआरबाबत न्यायालयाने स्थगिती दिली नसून, उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वांनी मान्य केला पाहिजे', असे म्हणत ओबीसींच्या आरक्षणाला कोणताही धक्का लागत नाही. त्यामुळे याची प्रक्रिया पुढे जाऊ द्या, असं आवाहन राधाकृष्ण विखे पाटील यांनी ओबीसी नेत्यांना केलं आहे.ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी १९९४ ला मंडल आयोगात मराठा समाजाचा समावेश केला असता तर हा प्रश्न आला नसता', असेही विखे पाटील म्हणाले आहेत. दरम्यान, 'आज सामाजिक विषमता निर्माण करण्याला शरद पवार जबाबदार असल्याचा आरोप देखील विखे पाटील यांनी यावेळी केला. हैदराबाद गॅझिटिअरच्या जीआर संदर्भामध्ये प्रकरण न्यायालयात असताना, मोर्चे काढणे योग्य नाही', असं देखील विखे पाटील ओबीसी नेत्यांना उद्देशून म्हणाले आहेत.दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. 'ज्या माणसानं १६ टक्के आरक्षण दिलं त्याला तुम्ही... छगन भुजबळला मोठं करणारे तेच, आरक्षण देणारे तेच आणि आज तेच सोबत नाहीत', असं म्हणत जरांगे यांनी भुजबळांवर पुन्हा निशाणा साधला.

## मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसची तगडी टीम

**मुंबई :** अखिल भारतीय काँग्रेस समितीने महाराष्ट्र काँग्रेसपाठोपाठ मंगळवारी रात्री मुंबई काँग्रेसच्या जम्बो कार्यकारिणीची घोषणा केली. यावेळी राजकीय घडाम ोडी समितीसोबतच मुंबई काँग्रेसचे कोषाध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, उपाध्यक्ष, म हासचिव, सचिव आणि इतर महत्त्वाच्या पदांची घोषणा करण्यात आली. राजकीय घडामोडी समितीचे अध्यक्षपद वर्षा गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

अखिल भारतीय काँग्रेस समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या आदेशानुसार, पक्षाचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी या समितीच्या नावांची घोषणा प्रसिद्धिपत्रकाच्या माध्यमातून केली. पंधरा जणांचा समावेश असलेल्या राजकीय घडामोडी समितीवर पक्षाच्या मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्यासह आ.ज्योती गायकवाड, खा.चंद्रकांत हंडोरे, अस्लम शेख, आ.अमीन पटेल, आ.भाई जगताप, सप्रा, ज्येष्ठ नेते नसीम खान, सुरेश शेट्टी या नेत्यांचा समावेश

## नरेंद्र मोदींचा कानमंत्र, फडणवीस कामाला लागले



**मुंबई :** नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मुंबईतील राजभवन येथे भाजपच्या प्रमुख नेत्यांची महत्त्वाची बैठक पार पडल्याची चर्चा आहे. नरेंद्र मोदी यांनी आपल्या दौऱ्यात भाजपच्या नेत्यांना म हत्त्वाचा कानमंत्र दिल्याची माहिती आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा कानमंत्र बहुमुल्याचा आहे. विशेष म्हणजे मोदी यांच्या दौऱ्यानंतर देवेंद्र फडणवीस लगेच कामालाही लागणार आहेत. महाराष्ट्र भाजपच्या गोटात सध्या जोरदार हालचाली सुरु आहेत. भाजप आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी रणनीती आखत आहे. या निवडणुकीत सर्वाधिक ठिकाणी जिंकून येऊन म हायुतीत मोठा भाऊ म्हणून छाप टाकावी, असा भाजपचा प्रयत्न असणार आहे. त्यासाठी भाजपच्या गोटात हालचाली सुरु असल्याची माहिती आहे.आतापर्यंत सम ोर आलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उद्यापासून तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर जाणार आहेत. भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे देखील देवेंद्र फडणवीस यांच्यासह महाराष्ट्र दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती मिळत आहे. या दौऱ्यात ते प्रत्येक ठिकाणचा आढावा घेणार असल्याची माहिती आहे. ते राज्यभरात विभागनिहाय आढावा घेणार असल्याची माहिती आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये ज्या हालचाली सुरु आहेत ते पाहता महाविकास आघाडीच्या गोटातही हालचाली होणं अपेक्षित आहे. कारण भाजप आतापासून कामाला लागली आहे.

# ओबीसींचा आज महामोर्चा; यशवंत स्टेडियम येथून सुरुवात




**नागपूर :** मराठा आरक्षणासाठी काढण्यात आलेला २ सप्टेंबरचा जीआर रद्द करण्याच्या मागणीसाठी सकल ओबीसी संघटनांच्यावतीने आज, शुक्रवारी यशवंत स्टेडियम ते संविधान चौकदरम्यान ओबीसी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. मोर्चाची सुरुवात यशवंत स्टेडियम येथून दुपारी १२ वाजता होणार असून संविधान चौक येथे समारोपाची सभा होणार आहे.या सभेला विदर्भातील ओबीसी संघटनांतील अभ्यासक, मान्यवर उपस्थित राहणार असून, समस्त ओबीसी बांधवांनी होऊ घातलेल्या या विशाल ओबीसी महामोर्चात शिस्तबद्ध आणि शांततेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे. सरकारने काढलेल्या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजाच्या हक्काच्या आरक्षणावर गदा येणार आहे. त्यामुळे आपल्या पुढच्या पिढीच्या न्याय्य हक्कासाठी सर्व ओबीसी बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मराठ्यांना हैदराबाद गॅझेटच्या आधारे कुणबी जातप्रमाणपत्र देणारा २ सप्टेंबरचा शासन आदेश मागे घेण्यासाठी आणि २०१५पासून मराठा समाजाला देण्यात आलेल्या ओबीसी प्रमाणपत्राबाबत श्वेतपत्रिका काढण्यात यावी, या मागण्यांसाठी विविध संघटनांनी सकल ओबीसी महामोर्चा स्थापन केला आहे. त्यांच्यातर्फे ओबीसींमधील विविध जातींना मोर्चात येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या महाम ोर्चासंदर्भात राज्याच्या कानाकोपऱ्यातील गावखेड्यांम ध्ये तथा जिल्हा पातळीवर ओबीसी संघटनांच्यावतीने बैठका घेण्यात आल्या असून महामोर्चाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे.पुणे येथील गुंड नीलेश घायवळच्या भावाला गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या सहीने शस्त्रपरवाना दिल्याचे उघडकीस आले आहे. गंभीर गुन्हे दाखल असताना घायवळला पासपोर्ट मिळतो, तो देश सोडून जातो. त्याच्या डोक्यावर कोणाचा आशीर्वाद आहे?', अशी थेट विचारणा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारला केली. 'गुंडांना पोसण्यासाठी महायुती सरकारने आता लाडका गुंड योजना आणावी', असा खोचक टोलाही वडेट्टीवारांनी मारत सरकारला चांगलेच धारेवर धरले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गर्लफ्रेंडचे चोचले पुरवण्यासाठी २० वर्षीय देवेशने केलं मोठं कांड

**नागपूर :** शिक्षण घेत असतानाच हॉटेल मॅनेजमेंटचा एक विद्यार्थी दुचाकी चोरीच्या मार्गावर गेला आणि अवघ्या काही महिन्यात ११ दुचाकींची चोरी करून पोलिसांच्या रडारवर आला. जुगार खेळण्याचं व्यसन आणि गर्लफ्रेंडचा खर्च भागवण्यासाठी चोरीच्या वाटेवर गेलेल्या या तरुणाला अखेर कळमना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी देवेश देवेंद्र सनोडिया (वय २०, रा. सुंदरनगर, पारडी) असं अटकेत असलेल्या तरुणाचं नाव आहे.



मार्च २०२५ पासून ऑक्टोबरपर्यंत कळमना परिसरातील कडकनाथ मार्केटमध्ये दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. व्यापारी, कामगार आणि ग्राहकांची वाहने बाजारपेठेतून वारंवार गायब होऊ लागल्याने नागरिक त्रस्त झाले होते. सततच्या तक्रारींनंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी त्या ठिकाणचा सखोल अभ्यास केला. चोरी घडणाऱ्या ठिकाणांचा आलेख तयार करून त्या परिसरात पोलिसांनी स्वतःच्या खर्चाने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले. अखेर याच फुटेजच्या आधारे आरोपीपर्यंत पोलीस पोहोचले.५ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी आरोपी देवेशला ताब्यात घेतलं असता त्याच्याकडे एक चोरीची दुचाकी सापडली. चौकशीत त्याने आणखी १० गाड्या चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून एकूण ११ दुचाकी आणि एक आयफोन असा सुमारे ३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.पोलीस तपासात उघड झालं की, देवेश हा मार्केट परिसरात नियमित ये-जा करत असे.


त्याच्या वडिलांचे कळमना मार्केटमध्ये भाजीपाला विक्रीचं दुकान असल्याने तो सहज त्या परिसरात फिरत असे, लोक खरेदीत व्यस्त असताना तो त्याचा गाडीची चावी ज्या गाडीला लागू शकते ती गाडी तो चोरून न्यायचा. चोरीनंतर खोट्या कागदपत्रांच्या आधारे ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर ती वाहनं विकत असे. याद्वारे अनेक निष्पाप लोकांनी त्याच्याकडून या गाड्या विकत घेतल्या असल्याचं पोलिसांना समजलं आहे.देवेश हॉटेल मॅनेजमेंटचं शिक्षण घेत होता. मात्र, त्याला जुगार खेळण्याचं व्यसन होतं. त्यातून झालेला तोटा आणि गर्लफ्रेंडवर होणारा खर्च भागवण्यासाठी त्याने चोरीचा मार्ग स्वीकारला. पोलिसांच्या चौकशीत असंही समोर आलं की तो दर गुरुवारी आणि शनिवारी सकाळच्या वेळात, जेव्हा मार्केटमध्ये सर्वाधिक गर्दी असते, त्यावेळी होंडा पॅशन आणि होंडा स्प्लेंडर या लोकप्रिय मॉडेलच्या गाड्यांवर लक्ष ठेवत असे. कळमना पोलिसांनी गेल्या पाच महिन्यांपासून आरोपीवर गुप्त पाळत ठेवली होती. शेवटी त्याच्या हालचालींचा तपशीलवार अभ्यास करून सापळा रचला आणि त्याला जेरबंद करण्यात यश आलं. पोलिस पुढील तपास करत असून देवेशकडून आणखी काही चोरीच्या घटनांचा तपशील समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बिल्डरच्या डोक्यावर बंदूक रोखत १० फ्लॅट मागितले

**पुणे :** गुंड निलेश घायवळ आणि त्याचा भाऊ सचिन घायवळ याच्यावर गुन्हा दाखल झाल्याची मोठी बातमी समोर येत आहे. एका बांधकाम व्यवसायिकाला धमकवल्या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल झाला आहे. विशेष म्हणजे काल शस्त्र परवाना दिला म्हणून निलेश घायवळचा भाऊ सचिन घायवळ हा चर्चेत आला होता.आज त्याच्यावर कोथरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

बांधकाम व्यवसायिकाला धमकी दिल्याप्रकरणी हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी घायवळ एवढ्यावरच थांबले नाहीतर तर त्यांनी जबरदस्ती संबंधित घरांवर ताबा देखील घेतला होता. संबंधित फ्लॅटची किंमत ५ ते ६ कोटी असल्याची माहिती समोर येत आहे.या प्रकरणात आरोपी निलेश घायवळ, सचिन घायवळ, बापु कदम, चिक्या ऊर्फ ओंकार फाटक, मनिष माथवड, सागर चौधरी, माऊली तोंडे, निलेश शर्मा आणि इतर ५ ते ७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निलेश घायवळ याने फिर्यादी बांधकाम व्यवसायिकाला पिस्तूल डोक्याला लावून त्यांच्या इमारतीमधील एकूण १० फ्लॅटवर बेकायदेशीरपणे खंडणीच्या स्वरुपात ताबा घेतला.

## गर्लफ्रेंडच्या नातेवाईकांनी ५ वर्षांच्या चिमुकल्याला संपवलं




**पाटणा :** एका ५ वर्षांच्या मुलाची धारदार शस्त्राने गळा चिरून हत्या करण्यात आली आहे. बिहारमधील जहानाबाद येथून ही धक्कादायक घटना समोर आली आहे. बुधवारी (८ ऑक्टोबर) रात्री उशिरा गावातील एका घरामागील परिसरात त्याचा मृतदेह पोत्यात भरलेला आढळून आला आणि संपूर्ण गावात खळबळ माजली. मृतदेहाची स्थिती इतकी भयानक होती की त्यामुळे गावकरीच काय तर पोलीसही हादरुन गेले.मिळालेल्या माहितीनुसार, तेहता पोलीस स्टेशन हद्दीतील पश्चिम सरेन गावात ही घटना घडली. चिमुकल्याच्या अशा निर्घृण हत्येने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. मृत मुलाचे नाव पाच वर्षीय आर्यन कुमार असल्याची माहिती आहे. तो सुधीर कुमार उर्फ भीम यादवचा मुलगा आहे. मुलाच्या वडिलांचे गावातील एका तरुणीशी प्रेमसंबंध असल्याचं सांगितलं जात आहे. तरुणीच्या कुटुंबाला या प्रेमसंबंधाची माहिती मिळताच त्यांनी सूड उगवण्यासाठी चिमुकल्या आर्यनची हत्या केल्याचा संशय आहे.या प्रकरणी पोलिसांनी गावातील दोन महिलांसह तिघांना ताब्यात घेतले आहे आणि संशयावरून त्यांची चौकशी सुरू आहे. घटनेपासून त्या तरुणीचे कुटुंब फरार असल्याची माहिती आहे. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस छापे टाकत आहेत.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, आर्यन संध्याकाळी उशिरापर्यंत त्याच्या घराजवळ खेळत होता. शेजारच्या एका तरुणाने त्याचे अपहरण केल्याचा संशय आहे. शोध घेत असताना गावातील ईश्वरी यादवच्या घरामागे पोत्यात त्याचा मृतदेह आढळून आला. त्याची हत्या करुन त्याच्या मृतदेहाचे तुकडे करुन पोत्यात भरण्यात आले होते. घटनेची माहिती मिळताच, एसडीपीओ मनीष चंद्र चौधरी त्यांच्या पथकासह घटनास्थळी पोहोचले, त्यांनी मृतदेह ताब्यात घेतला आणि तो शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. घटनेनंतर, सुरक्षेच्या कारणास्तव पोलीस दल तळ ठोकून आहे आणि आरोपींचा शोध घेतला जात आहे. प्रकरणामुळे गावात संताप निर्माण झाला आहे. आरोपींना त्वरित अटक करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत. या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे.

## आ.नायकवडी यांच्या गाडीवर अज्ञातांकडून दगडफेक

**सांगली :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विधान परिषदेचे आमदार इद्रिस नायकवडी यांच्या गाडीवर दोन अज्ञात व्यक्तींनी दगडफेक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मिरज तालुक्यातील जानराववाडी ते बेळंकी रोडवर ही घटना घडली. सुदैवाने यात कोण जखमी झालं नाही. मात्र गाडीच्या मागील बाजूच्या लाईटचे किरकोळ नुकसान झाले आहे. दगडफेक करणारे दोघेजण तिथून पळून गेले. त्या ठिकाणी नागरिकांनी मोठी गर्दी केली. या परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला. ते आज जानराववाडी येथून बेळंकीकडे जात असताना, दोन अज्ञात आणि मागून त्यांच्या चारचाकी गाडीवर दगडफेक केली. सुदैवाने यात कोण जखमी झालं नाही, मात्र गाडीच्या मागील बाजूच्या लाईटचे किरकोळ नुकसान झाले आहे. दगडफेक करणारे दोघेजण तिथून पळून गेले आहेत. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.या घटनेनंतर इद्रिस नायकवाडी यांनी प्रतिक्रिया दिली. 'मिरज तालुक्यातील विशेषत: पूर्व भागातील गावांचा विकासकामांचा आढावा घेण्यासाठी तसेच नागरिकांच्या अडचणी समजून घेण्यासाठी माझा दौरा सुरु आहे. हा दौरा गेल्या महिन्याच्या ५ तारखेपासून सुरु आहे. या दरम्यान आज जानरावावाडी बेळंकीकडे जात असताना संबंधित घटना घडली', अशी माहिती इद्रिस नायकवडी यांनी दिली.माझ्यासोबत माजी मंत्री अजितराव घोरपडे, पक्षाचे पदाधिकारी असे सर्वजण असल्यामुळे चार-पाच वाहनांचा ताफा होता. अजितराव घोरपडे यांच्या गाडीत मी बसलेलो होतो. माझ्या गाडीत माझे कार्यकर्ते आणि सुरक्षा रक्षक बसलेले होते. ती गाडी मागे होती. अशावेळेला आम्ही पुढे आल्यावर अज्ञातांनी आमच्या गाडीवर दगडफेक करुन पळ काढलेला आहे. पोलिसांना या घटनेची कल्पना दिली आहे. पोलीस तपास करत आहेत', अशी प्रतिक्रिया इद्रिस नायकवडी यांनी दिली.



## आमदाराला अश्लील व्हिडिओ पाठवून पैश्यांची मागणी

**ठाणे :** व्हॉट्अॅपवरुन कॉल करत एका आमदाराला अश्लील छायाचित्रे आणि व्हिडिओ पाठवले. त्यानंतर या आमदाराकडे एका महिलेने काही लाख रुपयांची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या आमदाराच्या तक्रारीनंतर संबंधित महिलेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी महिलेचा आता पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे.



तक्रारदार आमदार ठाण्यात राहत असून गेल्या वर्षी ते कोल्हापूर दौऱ्यावर होते, त्यावेळी त्यांना एका महिलेचे सातत्याने फोन येत होते. परंतु, फसवणूक होण्याच्या शक्यतेमुळे आमदाराने या महिलेचा फोन ब्लॉक केला होता. परत त्यांना एका महिलेचे व्हॉट्सअॅप कॉल आणि मेसेज येऊ लागले. या महिलेने त्यांना अश्लील फोटो आणि व्हिडिओ देखील पाठवले होते. गेल्या महिन्यात परत संबंधित महिलेने या आमदाराला संपर्क साधत, पाच ते दहा लाख रुपयांची मागणी केली. या प्रकरणी या आमदाराने आपली प्रतिमा मलीन करण्याचा हेतुपुरस्पर प्रयत्न केल्याची तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर, या महिलेच्या विरुद्ध ठाण्यातील चितळसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरीकडे, दादर येथे राहणाऱ्या ५७ वर्षीय महिलेची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. दक्षिण मुंबईतील एका प्रसिद्ध महाविद्यालयात पीडित महिला ग्रंथपाल आहे. महाविद्यालयात असताना तिला मोबाइलवर गॅस बिल भरण्याबाबत एक संदेश आला होता. तिने मेसेजमधील क्रमांकावर संपर्क केला असता, समोरील व्यक्तीने तुमचं वीज बिल भरायचं बाकी असल्याचं सांगत गॅस कनेक्शन बंद होण्याची भीती घातली. त्यावर महिलेने बिल भरण्याची तयारी दाखवताच समोरील व्यक्तीने एक अॅप डाऊनलोड करण्यास सांगितलं. अॅप डाउनलोड करताच महिलेच्या मोबाईलचा ताबा घेत समोरील व्यक्तीने घेत १७ वेळा ऑनलाईन व्यवहार करुन दोन लाख ७० हजार रुपये काढल्याचा आरोप होत आहे.

# “विराट-रोहितशी पंगा घेवू नका”

## अजित आगरकरांना माजी क्रिकेटपटू स्टीव्ह हार्मिसनने दिला इशारा..

**नवी दिल्ली :** भारतीय एकदिवसीय (वन-डे) क्रिकेट संघातील स्टार फलंदाज विराट कोहली आणि रोहित शर्मा हे २०२७चा विश्वचषक स्पर्धेत खेळणार का? या प्रश्नावर आता खल सुरु झाला आहे. टीम इंडियाचे सिलेक्टर अजित आगरकर यांनी ऑस्ट्रेलिया दौऱ्यापूर्वी रोहित शर्माची कर्णधारपदावरुन उचलबांगडी करत शुभमन गिलची कर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्या या निर्णयाने रोहित शर्माच्या चाहत्यांसह अनेक माजी क्रिकेटपटूंच्याही भुवया उंचावल्या. या गोंधळात आगरकरांनी ऑस्ट्रेलिया दौ□यासाठी संघ निवडताना रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या आगामी २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या योजनांबद्दल स्पष्ट उत्तर दिले नाही. आता इंग्लंडचा माजी वेगवान गोलंदाज स्टीव्ह हार्मिसन यानेही रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या निवडीवरुन अजित आगरकरांना इशारा दिला आहे




रोहित शर्मा आणि विराट कोहली हे दोघेही कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून आधीच निवृत्त झाले आहेत. त्यांनी आता फक्त एकदिवसीय सामन्यात खेळणार असल्याचे स्पष्ट केले ओ. त्यांनी यापूर्वी २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकात खेळण्याची इच्छा व्यक्त केली असली तरी, निवडकर्त्यांचे अलीकडील मौन सूचित करते की, या दोघांबाबत भविष्यात योजना बदलल्या आहेत. असे मानले जाते की, निवडकर्ते लवकरच विजय हजारे ट्रॉफीमध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या कामगिरीवर बारकाईने लक्ष ठेवतील.

कोहलीचा वारसा आणि प्रभाव रोहित शर्मापेक्षा खूपच जास्त आहे. विराट कोहलीला डावलणे हे टीम इंडियासाठी महागात पडू शकते. अत्यंत दबावाच्या परिस्थितीत विराटचा खेळ बहरतो. त्याच्या नावावर मोठ्या धावा आहेत, त्याचे वलय मोठे आहे. शर्माचे तसे नाही तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये विराटइतका प्रभावशाली नव्हता. भविष्यात या दोन दिग्गज खेळाडूंची संघात निवड अधिकाधिक मनोरंजक होण्याची अपेक्षा आहे, असेही हार्मिसनने म्हटले आहे.

### हार्मिसन नेमकं काय म्हणाले ?

विराट कोहली आणि रोहित शर्माच्या निवडीबाबत इंग्लंडचा माजी वेगवान गोलंदाज स्टीव्ह हार्मिसनने आपले मत व्यक्त केले आहे. तो म्हणाला की, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांचासाठी पुढील कार्यकाळ कठीण असू शकतो, कारण त्यांना माजी कर्णधार विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्याशी संघर्षाचा सामना करावा लागू शकतो. मला वाटते की हा अजित आगरकरसाठी कठीण शेवट असू शकतो. येथे कोणी जिंकले तर मला वाटते की ते विराट कोहली आणि रोहित शर्मा असतील, अजित आगरकर नाही... असेही शक्य आहे की, गोष्टींचा चुकीचा अर्थ लावला गेला असेल.'



## टीम इंडिया व्हाईटवॉश करण्यासाठी सज्ज

**नवी दिल्ली :** आत्मविश्वासपूर्ण यजमान भारतीय संघ शुक्रवारी सुरू होणाऱ्या दुसऱ्या आणि अंतिम कसोटी सामन्यात झगडणाऱ्या वेस्ट इंडिज संघाशी दोन हात करेल. या लढतीत साई सुदर्शनचे मनोधैर्य आणि नितीशकुमार रेड्डीची मायदेशातील परिस्थितीनुसार असणाऱ्या उपयुक्ततेचे मूल्यमापन हे भारताच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे.
अतिशय प्रतिभाशाली आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही अव्वल संघात स्थान मिळवण्यास सक्षम असलेल्या क्रिकेटपटूंच्या या उत्कृष्ट चमूपुढे वेस्ट इंडिजचा संघ अगदीच फिका आहे, हे यापूर्वीच सुस्पष्ट झाले आहे. पहिल्या कसोटीत विंडीजचा संघ सर्व आघाड्यांवर चारीमुंड्या चीत झाला आहे.
आपला गौरवशाली भूतकाळ गमावलेला हा संघ पारंपरिक कसोटी क्रिकेटमध्ये आपले अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करत आहे. त्यामुळे पुन्हा एकदा येथे त्यांच्यासाठी पुन्हा एकदा ही अस्तित्वाची लढाईच असणार आहे. सध्याच्या विंडीज संघातील बहुतांशी खेळाडू कामचलाऊ श्रेणीतील आहेत. सध्या विस्तारत असलेल्या टी-२० लीगमधील फ्रँचायझीदेखील या खेळाडूंना करारबद्ध करणार नाहीत, इतका त्यांचा दर्जा खालावलेला आहे. अहमदाबादमधील पहिल्या कसोटीत विंडीजने कोणताही प्रतिकार न करता स्वीकारलेला डावाचा पराभव, हे त्याचेच प्रतिबिंब मानले जात आहे.




भारताने नोव्हेंबर १९८७ नंतर दिल्लीत आजवर एकही कसोटी गमावलेली नाही. योगायोगाने ती कसोटी विंडीजविरुद्ध होती. त्यानंतर भारताने आतापर्यंत या मैदानात १२ विजय मिळवले, तर १२ सामने अनिर्णीत राखले आहेत.
रवींद्र जडेजाला ४ हजार कसोटी धावांचा माईलस्टोन सर करण्यासाठी आता फक्त १० धावांची आवश्यकता आहे. यापूर्वी कसोटीत ४ हजार धावा व ३०० बळींचा माईलस्टोन सर करण्याचा पराक्रम इयान बोथम, कपिल देव व डॅनिएल व्हेटोरी या तिघांनाच शक्य झाला आहे.

## ‘डी-कंपनी’कडून टीम इंडियाचा स्टार क्रिकेटर रिंकू सिंगला धमकी

**मुंबई :** आशिया कपमध्ये टीम इंडियासाठी विनिंग शॉट मारत चर्चेत आलेला क्रिकेटपटू रिंकू सिंग आता एका गंभीर प्रकरणामुळे पुन्हा चर्चेत आला आहे. रिंकू सिंगकडून ५ कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली असून, ही धमकी थेट अंडरवर्ल्ड डॉन डी-कंपनीकडून आल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. पोलिस तपासानुसार, आरोपींपैकी एकाने चौकशीत रिंकू सिंगकडून खंडणी मागितल्याची कबुली दिली आहे. अलीकडेच पाकिस्तानविरुद्धच्या एशिया कप फायनलमध्ये रिंकू सिंगने टीम इंडियासाठी जिंकवून देणारा फटका मारला होता. त्या कामगिरीनंतर तो चर्चेत आला होता, पण आता तो अंडरवर्ल्डकडून आलेल्या धमकीमुळे चर्चेत आहे.

रिंकू सिंग व्यतिरिक्त, काँग्रेसचे माजी आमदार बाबा सिद्दीकी यांच्या हत्या प्रकरणानंतर त्यांचा मुलगा जीशान सिद्दीकी यालाही धमकीचे कॉल येत होते. त्याच्याकडून १० कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. या प्रकरणात अटक केलेल्या आरोपींनी उघड केलं की त्यांनी रिंकू सिंगलाही धमकी देत ५ कोटींची मागणी केली होती. आरोपींची ओळख मोहम्मद दिलशाद आणि मोहम्मद नवीद अशी झाली आहे. नवीदला वेस्ट इंडीजमध्ये अटक करण्यात आली आणि १ ऑगस्ट २०२५ रोजी त्याला भारताच्या ताब्यात देण्यात आलं.

## दक्षिण आफ्रिकेने हिसकावला भारताचा विजयाचा घास !




**विशाखापट्टणम :** वृत्तसंस्था : रिचा घोषने ७७ चेंडूंत ९४ धावांचा झंझावात साकारत अडीचशे धावांचा टप्पा सर करून दिल्यानंतरही दक्षिण आफ्रिकन महिला संघाने अगदी शेवटच्या क्षणापर्यंत निकराने झुंज देत भारताच्या हातातोंडाशी आलेला विजयाचा घास अक्षरशः हिसकावून घेतला. प्रारंभी, भारताचा डाव ४९.५ षटकांत सर्वबाद २५१ धावांवर आटोपल्यानंतर दक्षिण आफ्रिकेने ४८.५ षटकांत ७ बाद २५२ धावांसह सनसनाटी विजय मिळवला.

विजयासाठी २५२ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा निम्मा संघ अवघ्या ८१ धावांत तंबूत परतला होता. मात्र, ट्रियॉनने लॉरासह सहाव्या गड्यासाठी ६१ धावांची, तर नॅदिने क्लेर्कसह सातव्या गड्यासाठी ६९ धावांची भागीदारी साकारत भारताचा संघर्ष खऱ्या अर्थाने संपुष्टात आणला. ट्रियॉन सातव्या गड्याच्या रूपाने बाद झाल्यानंतर भारताला अंधुकशी आशा होती. मात्र, नॅदिनेने ५४ चेंडूंत ८४ धावांची आतषबाजी करत भारताच्या संघर्षाला पूर्णविराम दिला.

तत्पूर्वी रिचा घोषने आठव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरत ९४ धावांचा पॉवरफुल्ल धमाका साकारत भारताला २५१ धावांपर्यंत मजल मारून दिली. भारताने ६ बाद १०२ या बिकट स्थितीतून केवळ रिचाच्या धमाकेदार खेळीमुळे अडीचशे धावांचा टप्पा सर केला. रिचाने ७७ चेंडूंत ११ चौकार व ४ उत्तुंग षटकारांसह ९४ धावा चोपल्या.

स्मृती मानधनाने वन-डे क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात एकूण ९७३ धावा जमवत २८ वर्षांपूर्वीचा जागतिक विक्रम मोडीत काढला. तिने ऑस्ट्रेलियाच्या बेलिंडा क्लार्कला मागे टाकले, मात्र तिची ही खेळी संघाला विजय मिळवू देऊ शकली नाही.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!


# आईची आठवण आणि बिग बी झाले भावुक

**मुंबई :** अमिताभ बच्चन हे केवळ अभिनयासाठीच नव्हे, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वासाठीही देशभरात आदरणीय मानले जातात. सध्या सोनी टीव्हीवर सुरू असलेल्या लोकप्रिय रिॲलिटी गेम शो 'कौन बनेगा करोडपती १७' मध्ये त्यांच्या ८३व्या वाढदिवसानिमित्त विशेष एपिसोड प्रसारित करण्यात आला. या एपिसोडमध्ये जे घडलं, त्याने केवळ प्रेक्षकांचेच नव्हे, तर खुद्द बिग बींच्याही डोळ्यांत पाणी आणलं.

या खास भागात प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर आणि अभिनेता-निर्देशक फरहान अख्तर यांनी पाहुणे म्हणून हजेरी लावली. त्यांच्या उपस्थितीत प्रसारित करण्यात आलेल्या एका व्हिडिओ क्लिपमध्ये अमिताभ बच्चन यांच्या आई, स्वर्गीय तेजी बच्चन यांचे एक जुने वक्तव्य दाखवण्यात आले. त्या म्हणाल्या होत्या, "मी खूप भाग्यशाली आहे. आता मी जिथेही जाते, लोक मला माझ्या मुलामुळे प्रेम आणि सन्मान देतात. एका आईसाठी याहून मोठं भाग्य काय असू शकतं?" आईच्या





या भावना ऐकताच अमिताभ भावूक झाले आणि त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

या क्षणाने संपूर्ण स्टुडिओमध्ये भावनांचा एक जिवंत वातावरण तयार झाला. एपिसोडमध्ये पुढे अमिताभ यांनी २००४ मध्ये आलेल्या 'लक्ष्य' या चित्रपटातील अनुभव शेअर केला. फरहान अख्तरने दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटाच्या आठवणी सांगताना ते म्हणाले, "त्या वेळी फरहान रात्री माझ्या खोलीत आला आणि विचारलं, 'अमिताभ अंकल, काही त्रास तर नाही ना?' आम्हाला वाटलं की, हा तर उस्ताद आहे - आम्हाला शिकवतोय की अभिनय कसा करायचा.

शोदरम्यान, एक गंमतीदार प्रसंगही घडला. जेव्हा फरहानने दोघांनाही विचारलं की, तुमच्यापैकी महिलांमध्ये कोण अधिक लोकप्रिय आहे? त्यावर अमिताभ यांनी लगेच जावेद अख्तर यांच्याकडे बोट दाखवलं. त्यावर जावेद साहब म्हणाले, हे काय प्रश्न आहे? हे विचारायची गोष्ट आहे का? आणि त्यांनी अमिताभ यांना हसत हसत सांगितलं, "असगळं उघड करू नकोस. या विशेष भागाने प्रेक्षकांना केवळ मनोरंजनच नाही, तर भावना आणि स्नेहानेही भारावून टाकलं. वाढदिवसाच्या निमित्ताने प्रसारित झालेला हा कार्यक्रम अमिताभ बच्चन यांच्या आयुष्यातील एका महत्त्वाच्या क्षणाची साक्ष ठरला. त्यांचं आईवरचं प्रेम, कृतज्ञता आणि नम्रता याचा प्रत्यय या क्षणातून पुन्हा एकदा दिसून आला.



## बॉडी बिल्डर वरिंदर घुमनचा हार्ट अटॅकने मृत्यू

**नवी दिल्ली :** पंजाबी फिल्म इंडस्ट्रीतून एक वाईट बातमी आली आहे. अभिनेता आणि बॉडी बिल्डर वरिंदर सिंह घुमनचं निधन झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हृदयविकाराच्या झटक्याने त्याचं निधन झालं आहे. यानंतर चाहत्यांना धक्का बसला आहे. वरिंदरच्या मृत्यूच्या बातमीनंतर एकच शोककळा पसरली आहे. असं म्हटलं जात आहे की वरिंदर अमृतसरमधील फोर्टिस रुग्णालयात त्याच्या दुखापतीसाठी किरकोळ शस्त्रक्रिया करण्यासाठी गेला होता. तो घरी एकटाच निघून गेला होता. ही एक किरकोळ शस्त्रक्रिया असल्याने तो आज परतणार होता, परंतु अचानक त्याला हृदयविकाराचा झटका आला आणि त्याचं निधन झालं.

वरिंदर सलमान खानसोबत 'टायगर ३' चित्रपटात दिसला होता. त्याच्या बॉडी बिल्डिंग कौशल्याचं सर्वांनी कौतुक केलं होतं. सलमानचे चाहते त्याच्या शरीरयष्टीने मंत्रमुग्ध झाले होते. हा चित्रपट २०२३ मध्ये प्रदर्शित झाला होता. जेव्हा चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला तेव्हा वरिंदर त्याच्या पर्सनॅलिटीमुळे चाहत्यांमध्ये लोकप्रिय झाला. वरिंदरला फिटनेसचं फार वेड होतं. तो 'मिस्टर इंडिया २००९' चा विजेता होता. शिवाय, तो 'मिस्टर एशिया चॅम्पियनशिप' मध्येही दुसऱ्या क्रमांकावर राहिला होता. 'द ही-मॅन ऑफ इंडिया' म्हणून तो ओळखला जात होता.

***

## साऊथच्या 'लेडी सुपरस्टार'चे हे ५ चित्रपट तुम्हाला थक्क करतील

**हैदराबाद : दक्षिण भारतीय सुपरहिट अभिनेत्री नयनतारा आज चित्रपटसृष्टीत २२ वर्षे साजरी करत आहे. तिला दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीची 'लेडी शाहरुख' म्हणून ओळखले जाते. ४० वर्षीय या अभिनेत्रीने २००३ मध्ये मल्याळम चित्रपटसृष्टीतून तिच्या चित्रपट कारकिर्दीला सुरुवात केली. आज ती मल्याळम, तमिळ, तेलगू आणि कन्नड चित्रपटसृष्टीवर राज्य करते. २०२३ मध्ये तिने शाहरुख खानच्या 'जवान' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. नयनतारा तिच्या २२ वर्षांच्या चित्रपट कारकिर्दीत ७५ हून अधिक चित्रपटांमध्ये दिसली आहे. आपण या अभिनेत्रीबद्दल पाच अवश्य पहावे अशा चित्रपटांवर चर्चा करू.**

----------------

**आरम :** २०१७ च्या थ्रिलर सोशल ड्रामा चित्रपट 'आरम' मध्ये, नयनताराने एका संग्राहकाची भूमिका केली होती जो एका गावकऱ्याच्या पाण्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रशासनाशी लढतो. या चित्रपटाचे दिग्दर्शन गोपी नैनार यांनी केले होते. तुम्ही तो Amazon Prime Video वर पाहू शकता.

----------------

**राजा आणि राणी :** जर तुम्हाला नयनताराच्या तमिळ रोमँटिक-कॉमेडियन चित्रपटांमध्ये रस असेल, तर तुम्ही अभिनेत्रीचा १२ वर्षे जुना चित्रपट, राजा राणी पाहू शकता. या चित्रपटात आर्या मुख्य भूमिकेत आहे. हा चित्रपट 'जवान' चे दिग्दर्शक ॲटली यांचा दिग्दर्शनात पदार्पण आहे, जो ब्लॉकबस्टर होता. तुम्ही हा चित्रपट YouTube वर मोफत पाहू शकता.

----------------

**नानुम राउडी धान :** विजय सेतुपती आणि नयनतारा स्टारर 'नानुम राउडी धन' हा चित्रपट पाहून तुम्हाला खूप आनंद होईल. २०१५ मध्ये प्रदर्शित झालेला हा ॲक्शन कॉमेडी चित्रपट तुम्हाला हादरवून टाकेल. तमिळ सुपरस्टार धनुष निर्मित या चित्रपटाचे दिग्दर्शन नयनताराचे पती विघ्नेश शिवन यांनी केले आहे. संगीत अनिरुद्ध रविचंदर यांनी दिले आहे. चित्रपटात, नयनताराला एका स्फोटात बहिरे केले जाते, परंतु ती त्या स्फोटाची एकमेव साक्षीदार आहे. चित्रपटाचा कळस म्हणजे ती गुन्हेगारांना कसे ओळखते. तुम्ही 'आह' वर चित्रपट पाहू शकता.

----------------

**कोलामावू नाईटिंगेल :** नयनताराच्या सुपरहिट चित्रपटांपैकी, 'कोलामावू कोकिला' हा क्राइम-कॉमेडी चित्रपट चुकवू नका. ८ कोटी बजेटमध्ये बनलेला या चित्रपटाने ७० कोटींपेक्षा जास्त कमाई केली. २०१८ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन नेल्सन दिलीपकुमार यांनी केले होते, ज्यांनी यापूर्वी रजनीकांतसोबत 'जेलर', थलापती विजयसोबत 'बीस्ट' आणि शिवा कार्तिकेयनसोबत 'डॉक्टर' असे चित्रपट बनवले आहेत. 'कोलामावू कोकिला'च्या कथेबद्दल बोलायचे झाले तर, ही एका मुलीची कथा आहे जी तिच्या आईच्या कर्करोगाच्या उपचारासाठी पैसे देण्यासाठी ड्रग तस्करीत अडकते. 'कोलामावू कोकिला' हा चित्रपट ZEE5 वर पाहता येईल.

----------------

**जवान :** नयनताराने २० वर्षांनंतर बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आणि ती खळबळजनक बनली. या अभिनेत्रीने शाहरुख खानसोबत 'जवान' या चित्रपटात काम केले होते, जिथे तिने एका पोलिस अधिकाऱ्याची भूमिका केली होती. 'जवान'चे दिग्दर्शन ॲटली यांनी केले होते. 'जवान' हा शाहरुख खान आणि नयनताराचा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे, तसेच ॲटलींचाही सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे, ज्याने जगभरात १,१०० कोटींपेक्षा जास्त कमाई केली आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

## सभापती, सदस्य पदांची आरक्षण सोडत १३ ऑक्टोबरला राजकीय पक्षांचे पदाधिकारी व नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद गट व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समिती गणांच्या सार्वत्रिक निवडणुकीतील सभापती, सदस्य आरक्षण निश्चिती व सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद गटांची आरक्षण सोडत आणि सर्व पंचायत समित्यांच्या सभापती पदाच्या आरक्षणाची सोडत सोमवारी, १३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे काढण्यात येणार आहे. तसेच पंचायत समित्यांच्या गणांची आरक्षण सोडत त्या त्या तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात येणार आहे. त्यानुसार बुलढाणा तालुक्यातील पंचायत समिती निर्वाचक गणासाठी आरक्षणाची सभा ही जिल्हा नियोजन समिती सभागृह या ठिकाणी आयोजित केली आहे. या आरक्षण सभेस सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी व तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बुलढाण्याचे तहसिलदार विठ्ठल कुमरे यांनी केले आहे.




राज्य निवडकणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार दि. ६ ऑक्टोबरपर्यंत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी जागा निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यातील प्रस्ताव तयार करुन विभागीय आयुक्त यांच्याकडे सादर करणे, दि. ८ ऑक्टोबरपर्यंत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखीव जागांच्या प्रस्तावास मान्यता देणे, दि. १० ऑक्टोबर रोजी आरक्षण सोडतीची सूचना वृत्तपत्रात प्रसिद्ध करणे, दि. १३ ऑक्टोबर रोजी आरक्षणाची सोडत काढणे, दि. १४ ऑक्टोबर रोजी प्रारुप आरक्षणाची अधिसूचना प्रसिद्ध करणे, दि. १४ ते १७ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमधील प्रारुप आरक्षणावर हरकती व सूचना सादर करणे, दि. २७ ऑक्टोबर रोजी प्राप्त प्रारुप आरक्षणावरील हरकती व सूचना आधारे अभिप्रायासह गोषवारा विभागीय आयुक्त यांना सादर करणे, दि. ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रारुप आरक्षणावर प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करुन आरक्षण अंतिम करणे, दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतिम आरक्षण शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे असा हा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

# नगरपरिषदेच्या प्रारुप प्रभागनिहाय आरक्षणावरील हरकती व सुचनांवर १५ व १६ ऑक्टोबर रोजी सुनावणी

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यातील ११ नगरपरिषदेचे प्रारुप प्रभागनिहाय आरक्षण जाहीर झाले असून या आरक्षणाबाबत प्राप्त हरकती व सुचनांवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली १५ व १६ ऑक्टोबर रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरविकास विभागाने दिली आहे. जिल्हा नगरविकास प्रशासनाने सुनावणीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या सुनावण्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कार्यालयात येथे पार पडणार आहेत. त्यानुसार १५ ऑक्टोबर रोजी बुलढाणा, सिंदखेड राजा, मेहकर, शेगाव, जळगाव जामोद आणि मलकापूर या नगरपरिषदेचे प्रारुप प्रभागनिहाय आरक्षणाबाबत प्राप्त हरकती व सुचनांवर सकाळी ११ ते दुपारी २.३० वाजेदरम्यान सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तसेच १६ ऑक्टोबर रोजी चिखली, लोणार, देऊळगाव राजा, खामगाव आणि नांदुरा या नगरपरिषदेचे प्रारुप प्रभागनिहाय आरक्षणाबाबत प्राप्त हरकती व सुचनांवर सकाळी ११ ते दुपारी २ वाजेदरम्यान सुनावणी घेण्यात येणार आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार




सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# समृद्धीवरील अपघातात ट्रक चालक ठार....




जनसंचलन/मलकापूर पांग्रा

महामार्गाच्या मुंबई कॉरिडॉरवरील चॅनल क्रमांक २९६.९ वर गुरुवारी सकाळी झालेल्या अपघातात ट्रक चालक जागीच ठार झाला. या घटनेमुळे महामार्गावरील काही विस्कळीत झाली होती. काळ वाहतूक प्राप्त माहितीनुसार, दत्तात्रय सतीश आव्हारे (वय २४, रा. श्रीरामपूर) हे ट्रक घेऊन चंद्रपूरहून संगमनेरच्या दिशेने जात होते. प्रवासादरम्यान चालकास डुलकी लागल्याने त्यांनी समोरील अज्ञात वाहनाला जोरदार धडक दिली. त्यानंतर ट्रकलाही पाठीमागून एका वाहनाने धडक दिली. या अपघातात दत्तात्रय आव्हारे गंभीर जखमी झाले आणि जागीच मृत्यू झाला. माहिती मिळताच ॲम्बुलन्स १०८ चे डॉ. वैभव बोराडे आणि चालक प्रदीप पडघान घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मृतदेह ग्रामीण रुग्णालय, मेहकर येथे हलविला. दरम्यान, मेहकर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर अपघातग्रस्त वाहन रस्त्याच्या कडेला हलवून वाहतूक सुरळीत केली. पुढील तपास मेहकर पोलिस करत आहेत. अलीकडील काळात समृद्धी महामार्गावर अपघातांचे आहे. प्रमाण वाढले

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा
बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | गुंतवणुक रक्कम ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | – |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मेहकर व लोणार तालुक्यांचा अतिवृष्टीग्र ग्रस्तांच्या यादीत समावेश करा,अन्यथा तीव्र आंदोलन रविकांत तुपकर

**जनसंचलन/बुलडाणा**

१० ऑक्टोबर रोजी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांच्या शिष्ट मंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. या प्रतिनिधी मंडळाने मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करून मेहकर व लोणार तालुक्यांचा मदतीच्या पॅकेजमध्ये समावेश करावा अशी ठाम मागणी केली अन्यथा आक्रमक आंदोलन करू असा इशारा दिला. तुपकर यांनी सांगितले की, लोणार व मेहकर तालुक्यात गेल्या काही दिवसांत म्हणजे जून, जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर मध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस पडून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेती पूर्णपणे खरडून गेली असून सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला असून अनेक ठिकाणी शेतजमिनीवर दगडं,पाणी व गाळ साचल्याने पुढील पिकांच्या पेरण्या देखील धोक्यात आल्या आहेत. रविकांत तुपकर यांनी राज्य सरकारवर तीव्र निशाणा साधतांना सांगितले की, ङ्ङराज्यातील ३५८ तालुक्यांपैकी २५३ तालुक्यांचा समावेश मदत पॅकेजमध्ये करण्यात आला आहे, मात्र उर्वरित १०५ तालुक्यांना अन्यायकारकरीत्या वगळण्यात आले आहे. हे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. लोणार व मेहकर तालुक्यातील शेतकऱ्यांना या पॅकेजपासून वंचित ठेवणे हा सरकारचा अन्यायकारक निर्णय आहे.तुपकर यांनी पुढे इशारा दिला की,ङ्ङजर मेहकर व लोणार तालुक्यांचा समावेश तात्काळ अतिवृष्टी ग्रस्तांच्या मदत पॅकेजमध्ये करण्यात आला नाही, तर क्रांतिकारी शेतकरी संघटना तिव्र आंदोलन छेडेल. सरकारने या आंदोलनाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी.फ्र यावेळी संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. प्रशासनाने प्रतिनिधी मंडळाचे निवेदन स्विकारून ते मुख्यमंत्री यांचेकडे पाठविण्याचे आश्वासन दिले व दोन्ही तालुके अतुवृष्टिग्रस्तांच्या यादीत घेण्याचा शब्द दिला.



लोकसभा निवडणूकीमध्ये या तालुक्यांमध्ये रविकांत तुपकर यांना भरघोस मतदान झाल्यामुळे व मंत्री प्रतापरावांना अपेक्षित मतदान न झाल्यामुळे तसेच राजकीय द्वेषभावनेतून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी मेहकर व लोणार तालुक्यातील जनतेला अद्दल घडवण्यासाठीच या तालुक्यांना मदत पॅकेज मधुन वगळल्याचा आरोप शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी माध्यमांशी बोलतांना केला.अशा कठीण प्रसंगी शेतकरी अडचणीत असतांना सुध्दा सत्तेतील काही लोकांना राजकारण सुचत आहे हे दुर्दैवी आहे,सरकार काही तालुक्यांना वगळून रडीचा डाव खेळत आहे असेही तुपकर म्हणाले क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या या आंदोलनामुळे बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा पुन्हा एकदा जागृत झाल्या आहेत. आता शासनाचा पुढील निर्णय काय येतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी क्रांतिकारी चे पदाधिकारी सहदेव लाड, अमोल मोरे, नितीन सानप , देवीदास सरकटे , गजानन नाईकवाडे, गणेश अंभोरे,योगेश तुपकर, गजानन डिगोळे यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सत्तेचा फायदा जनतेच्या हितासाठी २४ तासांच्या आतच वंचित ४ तालुक्यांचा समावेश आपदग्रास्त यादीत ...!

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकारने जिल्हा नैसर्गिक आपदग्रस्त जाहीर...!!

**जनसंचलन/बुलढाणा**

जून ते सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते . मात्र राज्य सरकारने जाहीर केलेल्या विशेष मदत पॅकेज मधून जिल्ह्यातील चार तालुके वंचित राहिले होते . केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी तात्काळ राज्याचे मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री आणि मदत व पुनर्वसनमंत्री यांच्याशी संपर्क साधुन ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली . २४ तासाच्या आताच नवीन सुधारीत परिपत्रक सरकारने निर्गमित केले . त्यामध्ये संपूर्ण बुलढाणा जिल्हा नैसर्गिक आपत्तीग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आला आहे . जून ते सप्टेंबर मध्ये झालेल्या अतिवृष्टीमध्ये बुलढाणा जिल्ह्यातील १३ ही तालुक्यांचे क्षेत्र बाधित झाले होते . शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी अतिवृष्टी . ढगफुटी व पुरामुळे बाधित झालेल्या क्षेत्राची पाहणी केली होती . आपदगस्तांना तात्काळ मदत देण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणेला दिल्या होत्या . आणि सरकारकडेही यासंदर्भाची वस्तुस्थिती मांडली होती . राज्य शासनाच्या वतीने आपदग्रस्तांना मदत जाहीर करण्यात आली . यामध्ये राज्यतील २५३ तालुक्यांचा समावेश करण्यात आला होता त्यासंदर्भातील परिपत्रक ९ ऑक्टोबरला शासनाच्यावतीने निर्गमित करण्यात आले . यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील नऊ तालुक्यांचा समावेश नैसर्गिक आपत्तीग्रस्त क्षेत्र म्हणून करण्यात आला होता परंतु जिल्ह्यातील मेहकर ,लोणार या तालुक्यामध्ये १५ सप्टेंबरला जवळपास २१५ मि .मी पावसाची नोंद झाली होती . या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात शेतांचे व घरांचेही नुकसान झाले होते तसेच संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यातही काही भागांमध्ये अतिवृष्टी झाली होती असे असतांना राज्य सरकारने जाहीर केलेल्या विशेष मदत पॅकेजमध्ये मेहकर लोणार जळगाव जामोद आणि संग्रामपूर हे तालुके वंचित राहिले होते काही तांत्रिक बाबींमुळे हे बाधित क्षेत्र वंचित राहिले असेल हे लक्षात आल्यानंतर केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब अजितदादा पवार आणि राज्याचे मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांच्याशी संपर्क साधून चर्चा केली . बाधित क्षेत्र मदतीपासून वंचित राहिले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले . या सर्वांनी वस्तुस्थिती जाणून घेतली आणि राज्य सरकारने २४ तासाच्या आतच सुधारित परिपत्रक काढले . यामध्ये राज्यातील वंचित आपदग्रस्त क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे .यात बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर लोणार संग्रामपूर आणि जळगाव जामोद या चारही वंचित तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे . त्यामुळे संपूर्ण बुलढाणा जिल्हाच नैसर्गिक आपत्ती क्षेत्रामध्ये नोंदला गेला आहे .केंद्र आणि राज्यातील सरकार हे जनतेच्या प्रतिक संवेदनशील आह. सर्व आपदग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत मिळणार आहे अशी माहिती केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या जनसंपर्क झाल्यातूनदेण्यातआलीआह

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८